13-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/12/2025 9:41 PM Page 1



## निवडक

### आसगाव शाळेजवळील रस्ता धोकादायक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**▶ प्रशासनाचे दुर्लक्ष**
**स्थानिकांमध्ये संताप**

**आसगाव, दि. १२ :** येथील शाळेपासून अवघ्या १०० मीटर अंतरावर मुख्य रस्ता नाल्यात खचत असून, यामुळे गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक पंचायतीने वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ही समस्या सुमारे दीड वर्षांपूर्वी सुरू झाली. शाळेजवळील रस्त्याचा एक भाग नाल्यातून झालेल्या धूपामुळे खचू लागला होता. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात आसगाव पंचायतीने तात्पुरत्या स्वरूपात आधार रचून रस्त्यावर वाहनांची वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला होता. याच मार्गावरून शाळेच्या बाल रथ बसेस दररोज जातात, त्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. मात्र आजतागायत कुठलाही कायमस्वरूपी उपाय योजण्यात आलेला नाही.

आसगावचे सरपंच हनुमंत नाईक यांनी जलसंपदा विभागाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की , गेल्या पावसाळ्यात काम शक्य नाही, असे सांगण्यात आले होते. आम्हाला आश्वासन देण्यात आले होते की पुढील पावसाळ्यापूर्वी संरक्षक भिंत बांधण्यासाठी सर्व कागदपत्रांची पूर्तता केली जाईल. मात्र आता पावसाळा जवळ आल्यावरही एक पाऊलही पुढे टाकले गेलेले नाही.

नाईक यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की , प्रशासन एखाद्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकारी वारंवार फाईल कुठे आहे हेही सांगू शकत नाहीत. ही पूर्णपणे जबाबदारीचा अभाव दाखवणारी स्थिती आहे.

जलसंपदा विभागाचे शिवोली विभागाचे सहाय्यक अभियंता विनू नाईक यांनी स्पष्ट केले की, हा सुमारे ३० लाख रुपयांचा प्रकल्प आहे. त्यामुळे वित्त विभागाची मंजुरी आवश्यक आहे, कारण विभागीय पातळीवरील मर्यादा १५ लाख रुपये आहे. सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे, मात्र फायनल मंजुरी मिळेपर्यंत निविदा काढता येणार नाही आणि काम सुरू होणार नाही.

नाईक यांनी मान्य केले की मंजुरी आल्यावरही प्रत्यक्ष काम सुरू होण्यासाठी पावसाळा संपेपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल. नाल्यात पाण्याची पातळी वाढल्यामुळे पावसाळ्यात काम करणे शक्य नाही. त्यामुळे हे बांधकाम आता ऑक्टोबरनंतरच सुरू होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शाळेच्या अत्यंत निकट असलेल्या या धोकादायक रस्त्यामुळे पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. योग्य ती खबरदारी घेतली नाही तर गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# एसटी नेतृत्वात मतभेद : भाजपच्या निवडणूक गणितात गोंधळ ?

**’ उटा ’ विरोधात वाढता असंतोष | राजकीय आरक्षणाच्या मागणीचे काय होणार ?**

■ *विठ्ठलदास हेगडे*
*टीम दैनिक हेराल्ड*




**पणजी, दि. १२ :** युनायटेड ट्रायबल असोसिएशन अलायन्स (यूटीएए)विरोधात उभा राहिलेला असंतोष आणि अनुसूचित जमातीच्या (एसटी) नेतृत्वातील वाढते मतभेद सत्ताधारी भाजपसाठी आगामी निवडणुकांत डोकेदुखी ठरू शकतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील दक्षिण गोवा मतदारसंघातील निकाल आणि एसटी मतदारांची भूमिका पाहता, राजकीय विश्लेषकांनी भाजपच्या रणनीतीला गंभीर इशारा दिला आहे.

गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत एसटी समुदायातील अनेक मतदार भाजपकडून फिरले आणि काँग्रेसकडे वळले. याचे प्रतिबिंब केपे , सांगे , काणकोण , धारबांदोडा , फोंडा , सासष्टी व मुरगाव या एसटी प्रभावी भागांमध्ये काँग्रेसच्या कामगिरीत दिसून आले. परिणामी, काँग्रेसने दक्षिण गोव्याची लोकसभा जागा जिंकली.

राज्यात सुमारे १२ टक्के एसटी मतदार असून हे मत निर्णायक ठरत असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. सध्या विधानसभेत चार एसटी आमदार आहेत. भाजपचे मंत्री गोविंद गावडे , सभापती रमेश तवडकर, गणेश गावकर आणि अपक्ष आमदार अंतोन वाझ . हे सर्वजण एसटी समाजासाठी १२ टक्के राजकीय आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी एकत्रित आवाज उठवत आहेत.

यूटीएएमध्ये ( उटा ) अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर येत असून, गाकुवेध फेडरेशनचे अध्यक्ष गोविंद शिरोडकर यांनी उटाचे अध्यक्ष आणि माजी मंत्री प्रकाश वेळीप यांच्याविरुद्ध थेट आव्हान दिले आहे. शिरोडकर यांनी सप्टेंबर २०२२ मध्ये झालेल्या उटाच्या निवडणुकींवर आक्षेप घेत जिल्हा निबंधक कार्यालयात याचिका दाखल केली आहे. त्यांनी संघटनेच्या कार्यकारिणीची अद्ययावत यादी सादर करण्याचीही मागणी केली आहे.

हेराल्ड मीडियाशी बोलताना, शिरोडकर म्हणाले, २०११ पासून आमच्या मूलभूत मागण्या प्रलंबित आहेत. ना राजकीय आरक्षण मिळालं, ना रिक्त सरकारी पदे भरली गेली. एसटी आयोगाचं गठनही झालेलं नाही आणि राज्य सरकारने आजवर आदिवासी क्षेत्र अधिसूचित केलेले नाहीत.

एसटी समुदायासाठी काम करणारे अधिवक्ता जॉन फर्नांडिस यांनीही सरकारच्या निष्क्रीयतेवर टीका करत गंभीर इशारा दिला. २०११ मधील बळ्ळी आंदोलनानंतरही मागण्या प्रलंबित आहेत. भाजप–एमजीपी युतीला पाठिंबा दिल्यानंतरही आश्वासने पूर्ण झाली नाहीत. परिणामी, लोकसभा निवडणुकीत मतदार काँग्रेसकडे वळले. हीच स्थिती २०२७च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा उद्भवू शकते, असे ते म्हणाले.

फर्नांडिस यांनी यूटीएएच्या नेतृत्वावरही नाराजी व्यक्त केली. संघटनेच्या उपनियमांनुसार कोणताही सदस्य दोन कार्यकाळांपेक्षा जास्त अध्यक्षपदावर राहू शकत नाही. मात्र वेळीप यांनी नियमांचे उल्लंघन करत नेतृत्वावर दीर्घकाळ वर्चस्व गाजवले आहे,असा आरोप त्यांनी केला.

प्रकाश वेळीप यांनी या आरोपांवर थेट प्रतिक्रिया देण्याचे टाळले. २००४ पासून आमचं काम लोकांना माहीत आहे. यूटीएए ही जनचळवळ आहे. शिरोडकर यांच्या याचिकेवर अधिकार्यांनी निर्णय घ्यावा. टीका सकारात्मकपणे स्वीकारतो, असे त्यांनी सांगितले.

वेळीप यांनी असेही स्पष्ट केले की, राज्य सरकार गोव्यातील आदिवासी समाजाच्या ओळखीचे रक्षण करण्यासाठी किमान २५ क्षेत्रांना अनुसूचित क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याच्या प्रक्रियेत आहे. ही प्रक्रिया सुरू असून, आदिवासींच्या संस्कृती, नीतिमत्ता आणि हक्कांचे संरक्षण करण्याचा आमचा उद्देश आहे, असे ते म्हणाले.

# ४६.५२ कोटींच्या म्हापसा नदी सुधार प्रकल्पाला मंजूरी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**म्हापसा, दि. १२ :** दरवर्षी होणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी म्हापसा नदीच्या सुधार प्रकल्पाला अखेर प्रारंभ होणार आहे. ४६.५२ कोटी रुपये खर्चाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेत गाळ काढणे, रुंदीकरण, पूरनियंत्रण भिंती बांधणे आणि अत्याधुनिक पंपिंग यंत्रणा बसवण्याचा समावेश आहे. या प्रकल्पाची औपचारिक पायाभरणी समारंभ १३ जून रोजी पार पडणार आहे.

जलसंपदा विभागाच्या देखरेखीखाली साकारला जाणारा हा प्रकल्प गिरी गावापासून राष्ट्रीय महामार्गावरील तार जंक्शनपर्यंतच्या सुमारे ४.५ किलोमीटर नदीपात्रासाठी आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे काम मेसर्स बागकिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीला देण्यात आले असून, सुमारे ३०० दिवसांत ते पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पांतर्गत नदीच्या पात्रातील गाळ काढणे, पात्राचे रुंदीकरण आणि दोन्ही किनाऱ्यांवर माती–मुरमाच्या साह्याने पूरबांधांची उभारणी केली जाणार आहे. यामुळे पावसाळ्यातील पाण्याचा सहज निचरा होणार असून, वारंवार होणाऱ्या पूरस्थितीपासून आसपासच्या भागांना दिलासा मिळणार आहे.भरती–ओहोटी दरम्यान नदीत पाण्याच्या उलट प्रवाहाला थोपवण्यासाठी दोन्ही बाजूंनी सुमारे २०० मीटर अंतरावर फ्लॅप गेट आणि स्लूइस गेट बसवले जातील. ही गेट्स भरतीच्या वेळी आपोआप बंद होणार असून, त्यामुळे पाण्याचा बॅकफ्लो रोखता येणार आहे.

नदीकाठ मजबूत करण्यासाठी काँक्रीट आणि लेटराइट बोल्डरचा वापर करून पूर संरक्षण भिंती उभारल्या जातील. शिवाय गिरी परिसरात पूरपाण्याचा स्वतंत्र निचरा सुनिश्चित करण्यासाठी खास स्लूइस गेट स्ट्रक्चरही बसवण्यात येणार आहे.

अतिरिक्त पाण्याच्या व्यवस्थापनासाठी प्रकल्पात उच्च क्षमतेची पंपिंग प्रणाली बसवली जाईल. यामध्ये ताशी ३,००० घनमीटर क्षमतेचे पंप, ३२० केव्हीए डिझेल जनरेटर, नियंत्रण कक्ष, पाइपलाइन यांसह सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

जलसंपदा विभागाचे मत आहे की, या प्रकल्पामुळे नदीचे पर्यावरणीय आरोग्य पुनर्संचयित होईल आणि पूर, साचलेले पाणी, तसेच जलप्रदूषणासारख्या समस्यांवर दीर्घकालीन नियंत्रण मिळवता येईल. नदीच्या पुर्नजीवनाची ही सुरुवात म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

# होली फॅमिली हाऊस इमारत दुसऱ्यांदा कोसळली

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**तातडीने स्थलांतर आणि सील करण्याचा आदेश**

**मडगाव, दि. १२ :** सिने लताजवळील जीर्ण झालेल्या होली फॅमिली हाऊसइमारतीचा काही भाग गेल्या महिन्यात दुसऱ्यांदा कोसळल्यानंतर, दक्षिण गोवा जिल्हा प्रशासनाने तातडीची कारवाई करत इमारत २४ तासांत सील करण्याचा आणि सर्व रहिवाशांना, विशेषतः व्यावसायिक वापर करणाऱ्यांना तातडीने स्थलांतरित करण्याचा आदेश दिला.

दक्षिण गोवा जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (डीडीएमए) अध्यक्षा एग्ना क्लीटस, आयएएस यांनी मंगळवारी रात्री उशिरा हा आदेश काढला. यात सासष्टी चे मामलतदार, मडगाव पोलिस आणि वाहतूक शाखेला समन्वयाने आणि तत्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले .

आदेशानुसार, मडगाव पोलिस स्टेशनच्या मदतीने सासष्टी मामलतदारांनी इमारतीच्या सर्व प्रवेशद्वारांवर आणि पायऱ्यांवर सील लावावे. वाहतूक शाखेला परिसरात कोणतेही वाहन पार्क होणार नाही याची खात्री करण्यास सांगितले आहे. तसेच, इमारतीच्या परिसरात सुरक्षा बॅरिकेडिंग, चेतावणी फलक आणि इतर खबरदारी उपाय योजना तात्काळ राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

डीडीएमएने स्पष्टपणे सूचित केले आहे की या आदेशाचे पालन न केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत कडक दंडात्मक कारवाई केली जाईल. स्थानिक नगरपालिकेला देखील संबंधित पायऱ्या उचलण्यासाठी भागीदार करण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशाचे मूळ कारण म्हणजे उपजिल्हाधिकारी कार्यालयाने सादर केलेला तांत्रिक अहवाल, ज्यात इमारत अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अहवालात म्हटले आहे की, ही रचना निवासी हेतूसाठी नाही, तर व्यावसायिक वापरासाठी वापरली जात आहे. स्लॅब, बाल्कनी व व्हरांड्यातून सांडणारे काँक्रीट घातक आहे. इमारतीची स्थिती अशांत, अस्थिर आणि तातडीने पाडणेच योग्य.

फातिमा प्रेसी अँटाओ यांनी सादर केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये देखील इमारतीची स्थिरता असमाधानकारक असल्याचे निष्कर्ष देण्यात आले होते. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीचा निर्णय घेतला.

विशेष म्हणजे, या इमारतीत तळमजला आणि पहिल्या मजल्यावर अनेक दुकाने आहेत, ज्यामध्ये अद्याप काही भाडेकरू कार्यरत आहेत. कोसळलेला भाग हेच धोक्याचे संकेत असल्यामुळे प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी पावले उचलली आहेत.

सध्याची परिस्थिती सार्वजनिक सुरक्षेसाठी गंभीर असून, शेजारच्या मालमत्तांना आणि परिसरात फिरणाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक कारवाई आवश्यक आहे,असे आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

# खाजन जमिनींवरील संकट गडद : खाझन बोर्ड' स्थापपण्याचा निर्णय

**संरक्षक बंधारे फोडून खारे पाणी शेतात सोडण्याचे प्रकार सुरुच | शेती आणि पाण्याच्या स्रोतांवर खोल परिणाम**

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. १२ :** गोव्यातील पारंपरिक खाजन जमिनी सध्या अभूतपूर्व संकटात सापडल्या आहेत. बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्यांकडून संरक्षक बंधारे जाणूनबुजून फोडून खारे पाणी शेतात सोडले जात असल्याने ही शेती अक्षरशः उद्ध्वस्त होत आहे. राज्य सरकारने आता या अराजकाला आळा घालण्यासाठी खाजन लँड मॅनेजमेंट प्रोग्राम (केएलएमपी) जाहीर केला असून, स्वतंत्र खाजन बोर्ड स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

केएलएमपीअहवालानुसार, राज्यातील सुमारे १३ हजार हेक्टर खाझान जमिनींना बेकायदेशीर घुसखोरी, संरचनात्मक ऱ्हास व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी बांध भेदून खारे पाणी शेतात सोडले जात आहे, ज्यामुळे मासेमारीसाठी सोयीस्कर परिस्थिती निर्माण केली जाते, पण त्याच वेळी या प्रक्रियेत पीकांचे आणि जमिनीचे फार मोठे नुकसान होते. शतकानुशतके टिकून असलेले हे बंधारे आज जाणूनबुजून नष्ट केले जात आहेत.

शेतीसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या जमिनींपासून एकेकाळी भात, नारळ, मीठ व मत्स्य उत्पादन होत असे. मात्र, क्षारयुक्त घुसखोरीमुळे आता केवळ शेतीच नव्हे, तर गोड्या पाण्यातील जलचर, पिण्याचे पाणी आणि अंतर्गत जलस्त्रोतही धोक्यात आले आहेत. कमी पावसाच्या वर्षांत या समस्येचे प्रमाण अधिकच गडद होते.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या योजनेनुसार, खाजन बोर्ड हे स्वतंत्र अधिकार प्राप्त संस्था असेल. त्याला जमीनवापर श्रेणी ठरवण्याचा, दुरुस्तीचे आदेश देण्याचा, कायदेशीर कारवाई करण्याचा व वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित झोनिंग करण्याचा अधिकार असेल. हा बोर्ड पर्यावरण विभागाच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणार असून सहा महिन्यांत स्थापण्यात येणार आहे.

खाजन जमिनींच्या ऱ्हासामागे केवळ निसर्ग वा बेकायदेशीरता जबाबदार नाही, तर यामध्ये प्रशासनाच्या अंमलबजावणीतल्या त्रुटी, शहरी अतिक्रमण, आणि स्थानिक पातळीवर हरवलेली जबाबदारीही तितकीच जबाबदार आहेत. पणजी, मडगाव, कळंगुट, कांदोळी या शहरांजवळील खाजन क्षेत्रात अनधिकृत वस्ती, बांधकाम कचरा आणि खाणीतील गाळामुळे ही जमीन अजूनच निकामी झाली आहे.

खाजन व्यवस्थापन एकेकाळी स्थानिक समुदायांनी चालवलेली सहकारी यंत्रणा होती. मात्र १९६४ च्या कृषी भाडेपट्टा कायद्यानंतर ही व्यवस्था विस्कळीत झाली. आज बहुतेक भाडेपट्टा संघटना निष्क्रिय आहेत, आणि याच पोकळीत बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्यांनी आपले जाळे टाकले आहे.

अद्याप काही शेतकरी भात आणि भाज्यांची करीत असलेली लागवड हे दर्शवते की बेकायदेशीर कृत्यांना आळा घातल्यास आणि आवश्यक सहकार्य दिल्यास हे क्षेत्र पुनश्च कृषी उत्पादनक्षम बनू शकते. केएलएमपी अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, आर्थिक प्रोत्साहने, आणि भाडेपट्टा संघटनांचे पुनरुज्जीवन यावर भर दिला जाणार आहे. पारंपरिक बांधकाम पद्धतींचे दस्तऐवजीकरण करून त्यात आधुनिक साधनांची भर दिली जाणार आहे.

समुद्रसपाटीतील वाढ, चक्रीवादळे आणि पूर या हवामान बदलांच्या घटनांमुळे आधीच कमकुवत झालेले बंधारे कोसळण्याचा धोका वाढत आहे. खाजन जमिनी जैवविविधतेचे रक्षण करत कार्बन शोषणाचे काम करतात. त्यामुळे केएलएमपी केवळ जमिनीचे पुनरुज्जीवन नव्हे, तर गोव्याच्या अन्नसुरक्षा व पर्यावरणीय सुरक्षेसाठी आवश्यक पाऊल आहे.

खाजन बोर्ड यशस्वी होण्याच्या दृष्टीने त्याच्या अधिकारांची ठाम अंमलबजावणी, उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई, आणि स्थानिक लोकांचा सकस सहभाग अत्यावश्यक ठरणार आहे. गेल्या अनेक दशकांतील उदासीनतेला मागे टाकत हे संस्थात्मक पुनर्बांधणीचे प्रयत्न गोव्याच्या कृषी आणि पर्यावरणीय धोरणाला नवी दिशा देतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# शिरगाव चेंगराचेंगरी : आठही अधिकाऱ्यांची नोटीसांना उत्तरे

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १२ :** शिरगावच्या लईराई देवी जत्रेतील चेंगराचेंगरी प्रकरणात कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या सर्व आठही सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांची उत्तरे शासनाकडे सादर केली आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घडलेल्या या हृदयद्रावक घटनेत सहा भाविकांचा मृत्यू झाला होता, तर सुमारे शंभर भाविक जखमी झाले होते.

दुर्घटनेनंतर प्राथमिक चौकशीच्या निष्कर्षानुसार राज्य सरकारने तत्काळ पावले उचलत उत्तर गोव्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी, उत्तर गोवा पोलिस अधीक्षक, डिचोलीचे उपजिल्हाधिकारी, डीवायएसपी डिचोली व मोपा पोलिस ठाण्यांचे प्रभारी निरीक्षक आणि शिरगाव ग्रामपंचायतीचे सचिव या आठ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या अधिकाऱ्यांची घटनेनंतर तातडीने बदलीही करण्यात आली होती.

कारणे दाखवा नोटीस बजावलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी आपली उत्तरे सादर केली आहेत.उत्तरे तपासल्यानंतर ती शिस्तभंग समितीकडे सादर करण्यात येतील.यावर पुढील कार्यवाही केली जाईल.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर गठित करण्यात आलेल्या तथ्य शोध समितीने दिलेल्या अहवालात मंदिर समिती, जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, ग्रामपंचायत तसेच गर्दीतील काही ’धोंड’ भक्तगणांच्या बेशिस्त वर्तनालाही सामूहिकपणे जबाबदार धरले आहे.

समितीने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले होते की, याआधीही शिरगाव जत्रेत गर्दी नियंत्रणाच्या उपाययोजना अपुऱ्या असल्याच्या तक्रारी होत्या. यंदाही नियोजनाचा अभाव, समन्वयाचा अभाव, अपुरे सुरक्षा कर्मचारी, तसेच धार्मिक उत्साहात अतिरेक करणाऱ्या काही भक्तांच्या वर्तनामुळे परिस्थिती बिघडली.

प्रशासनाच्या पातळीवर आता दोषी अधिकाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची प्रक्रिया सुरू होणार असून, त्यासाठी संबंधित विभागांना अहवाल सादर करण्यात येणार आहे. ही घटना केवळ नियोजनातील त्रुटीच नव्हे, तर प्रशासनातील दिरंगाईचेही परिणाम असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.